**दिव्य मराठी विशेष** • प्रा. राहुल वाघ यांचे प्रतिपादन, बार्टीतर्फे अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ऑनलाईन व्याख्यानमाला

# अण्णाभाऊ साठेंचे कार्य अन् विचार आजच्या पिढीला कळावे

**प्रतिनिधी** | जालना

खरंच अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य आणि सामाजिक या दोन्ही कार्याचा वारसा खुप मोठा आहे. पण, तो अन् त्यांचे विचार आजच्या पिढीला कळणे गरजेचे आहे. से प्रतिपादन प्रा. राहुल वाघ यांनी केले.

पुणे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांचा जन्मशताब्दी वर्षानिमित्त ऑनलाइन (वेबिनार) व्याख्यानमाला १ ते ५ ऑगस्टदरम्यान घेण्यात आल्या. यात पहिल्या पुष्पात ते बोलत होते. ॲड. अभयसिंह भोसले म्हणाले की, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचा समाज परिवर्तन काय आहे. तो समजावून सांगत ते खरंच समाजासाठी कशा प्रकारे झगडले याची जाणीव करून देत प्रत्येकांनी शिकले पाहिजे, त्यामुळे खऱ्या अर्थाने समाज परिवर्तन घडेल, तरच खरी अण्णाभाऊ हे जन्मशताब्दी वर्ष अभिवादनास पात्र ठरेल. दुसऱ्या पुष्पात वक्ते म्हणून शाहीर नानाभाऊ परिहार हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष इंजि. जितेंद्र साळवे हे होते. या वक्त्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे व्यक्तिगत जीवन व त्यांची परिस्थिती व त्यावर त्यांनी मात करून केलेला संघर्ष यावर प्रकाश टाकला. तर तिसऱ्या पुष्पा वक्ते लक्ष्मण कांबळे हे होते. तर अध्यक्षस्थानी विकास कुंदुरकर (जिल्हा व्यवस्थापक, अण्णाभाऊ साठे महामंडळ) हे होते. या वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील संघर्षमय कथा व जातीच्या पलीकडे जाऊन मांडलेली व्यथा यावर विचार मांडत मार्गदर्शन केले.चौथ्या पुष्पात वक्ते म्हणून डॉ. किशोर वाघ हे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी डॉ. दिवाकर कुलकर्णी हे होते. या वक्त्यांनी आपल्या विचारातून अण्णाभाऊ साठे यांना एकाच जातीत न ठेवता त्यांचे कार्य सर्व समाजाच्या लोकांना कळायला हवे. अण्णाभाऊंनी वेगवेगळ्या काव्यातून आणि शाहिरीतून समाज प्रबोधन व अन्यायाविरुद्ध आवाज उठवल्याचे आपण पाहतो. त्यामुळे सर्वांनी अण्णाभाऊ यांचे साहित्य आवर्जुन वाचावे. पाचव्या पुष्पात वक्ते म्हणून दीपक चातुरकर हे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थांनी बालाजी सरोदे व कैलास पांजगे हे होते. विद्यार्थी हा अभ्यास व बौद्धिक जोरावर आपले ध्येय गाठू शकतो. जसे की अण्णाभाऊ साठे यांनी दीड दिवसाच्या शाळेमध्ये आपले उद्दिष्ट गाठले, त्यामुळे प्रत्येकांनी अण्णाभाऊ यांचे विचार आत्मसात करुन मार्गक्रमण करावे, असे आवाहन वक्त्यांनी केले. सहाव्या पुष्पात वक्त्या गंगुबाई भालेराव या होत्या. तर अध्यक्षस्थानी विजेंद्र भंडारी हे होते. त्यांनी अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य अन् शाहिरीतून अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करत त्यावर प्रहार केला. सातव्या पुष्पात वक्ते म्हणून सचिन निकम हे होते.




तर अध्यक्षस्थानी विजय पुसे व प्रशांत वाघमारे हे होते. आंबेडकरी विचारांना प्रेरित होऊन चळवळीत उतरलेले अण्णाभाऊ यांचे विचार मांडले विद्यार्थी कृतीशील असावा हेही त्यांनी सांगितले. तर आठव्या पुष्पात वक्ते प्रा. दीपक साळवे हे होते तर अध्यक्षस्थानी प्रा. भगवान पालकर हे होते. तर नवव्या पुष्पात वक्त्या म्हणून प्रा. निर्मला जादूही या होत्या. तर अध्यक्षस्थांनी चंद्रकांत गांगुर्डे हे होते. लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी वर्षानिमित्त १ ते ५ ऑगस्टदरम्यान आयोजित ऑनलाइन (वेबिनार) व्याख्यानमाला ही सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, बार्टीचे महासंचालक कैलास कणसे, मुख्य प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्यात घेण्यात आली. ही व्याख्यानमाला यशस्वीतेसाठी प्रकल्प अधिकारी मुंजाजी कांबळे, प्रा. रेखा बोर्डे, समतादूत पारुल राठोड, उमा गाडेकर, अनिता बोडके, भगवान कुदर, दिपाली मंडलिक, सुधाकर वरपे, सतीश पवार, कमर शेख व अतिश बेंद्रे यांनी परिश्रम घेतले.

विदर्भ मतदार

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रम सप्ताहात

**अकोट प्रतिनिधी:** साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मा.धनंजय मुंडे मंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहा.विभाग,मा.विश्वजित कदम, राज्यमंत्री(सा.न्या.व.वि.स.वि),मा.पराग जैन - नैनुटीया (भाप्रसे) प्रधान सचिव(सा.न्या.व.वि.स.वि),मा.कैलास कणसे महासंचालक बार्टी,यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तसेच श्रीमती प्रज्ञा वाघमारे मुख्य प्रकल्प संचालक यांच्या संकल्पनेतून,जिल्हा प्रकल्प अधिकारी विजय बेदरकर यांच्या स्थानिक मार्गदर्शनात समतादूत प्रकल्पाच्या संयोजनात लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.त्यामध्ये अकोला जिल्हा समतादूत टीम च्या मुख्य संयोजनात अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अण्णाभाऊ साठे यांचे जिवनकार्य,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,संविधान जागृती,संत महापुरुष यांचे विचार अशा विषयावर आधारित जनजागृतीपर मार्गदर्शक ऑनलाईन प्रबोधन कार्यक्रम,व्याख्याने,चर्चासत्र संपन्न झाली.त्यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत वक्ते, साहित्यिक,नवनियुक्त उच्चपदस्थ अधिकारी, कवी,लेखक,पत्रकार व प्रबोधनकार मंडळी यांनी आपले विचार प्रगट केले.या कार्यक्रमात अकोला जिल्हातील प्रत्येक तालुक्यातील



समतादूत यांनी आपल्या तालुका कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना लाभार्थ्यांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी सोशल मीडिया च्या माध्यमातून या ऑनलाइन उपक्रमाचा प्रचार प्रसार करून आपल्या मुख्य संयोजनात हे कार्यक्रम आयोजित केले होते.या ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रमाचा समारोप दिनांक ०५/ऑगस्ट/२०२० ला संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून पत्रकार संतोष चक्रनारायन हे लाभले होते तसेच कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून किरण डोंगरे व समतादूत मनेश चोटमल तसेच प्रज्ञा खंडारे हे लाभले होते.यावेळी लोकगायक सौ.कविता विनोद सिरसाट यांनी आपल्या आवाजातून भीमगीत लोकशाहीर अण्णाभाऊ यांच्या जीवनावर आधारित लोकगीते व भीमगिते यावेळी सादर केली.कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक मंडळींनी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी माहिती विषद करून त्यांच्या विचाराची समाजाला खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन केले तसेच बार्टी समतादूत टीम सदस्यांनी यावेळी बार्टीचे विविध उपक्रम,सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती दिली.

या ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रमाला जिल्हातील ग्रामसेवक,सरपंच,विद्यार्थी तसेच इतर लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होत लाभ घेतला.सप्ताहात एकूण २८ ऑनलाइन कार्यक्रम संपन्न झाले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समतादूत रविना सोनकुसरे,ॲड.वैशाली गवई अकोला,समता तायडे पातूर,शुभांगी लव्हाळे तेल्हारा,स्मिता राऊत बाळापूर,उपेंद्र गावंडे,विनोद सिरसाट बार्शीटाकळी,बालाजी गिरी अकोट यांनी परिश्रम घेतले.

विषय मांना लागला. ५ ऑगस्ट रोजी पार पडला. याच औचित्य साधून भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# नान्होरी येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**ब्रम्हपुरी ब्लास्ट प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे च्या वतीने सुरु असलेल्या समतादूत प्रकल्पाअंतर्गत २०१५ पासून सर्व महापुरुष यांच्या जयंती व स्मृतीदिनाचे कार्यक्रम घेतले जातात. सध्या सुरु असलेल्या कोरोना महामारीच्या जागतिक मंदित सुध्दा समतादूत जनजागृतीचे काम करीत आहेत. सन २०२०, अण्णाभाऊ साठे यांचं जन्मशताब्दी वर्ष, त्यानिमित्ताने याच धर्तीवर बार्टीचे महासंचालक कैलास कणसे, मुख्य प्रकल्प संचालक प्रज्ञा वाघमारे, चंद्रपूर जिल्ह्याचे प्रकल्प अधिकारी मनीष गणवीर यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रम्हपुरी तालुक्यात समतादूत प्रिती मेश्राम कार्यरत आहेत. ग्रामपंचायत नान्होरी येथील सरपंच शरद



भोयर यांच्या अध्यक्षतेखाली अण्णाभाऊ साठे जयंतीचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मोरेश्वर ठाकरे, ग्रा.पं. सदस्य दीनदयाल शेंडे, अर्चना शेंडे, अजय शेंडे इत्यादी उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रिती मेश्राम उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांना अण्णाभाऊ साठे यांचा जीवनसंघर्ष यावर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, अण्णाभाऊंनी 'फकीरा' ही कादंबरी बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित केली. बाबासाहेबांनी अण्णाभाऊंना प्रेरणा दिली. त्या प्रेरणेतून अण्णाभाऊ लिहितात, "जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव". याचबरोबर या जयंती निमित्त प्रिती मेश्राम यांनी अण्णाभाऊंची प्रतिमा ग्रामपंचायत ला भेट दिली व उपस्थितांना सोबत घेवून वृक्षारोपण सुध्दा करण्यात आले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रम सप्ताह संपन्न

प्रतिनिधी/९ऑगस्ट

अकोला :- साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मा.धनंजय मुंडे मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहा. विभाग, विश्वजित कदम, राज्यमंत्री (सा.न्या.व.बि.स.बि), पराग जैन - नैनुटीया (भाप्रसे) प्रधान सचिव (सा.न्या. व.बि.स.बि), कैलास कणसे महासंचालक बार्टी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तसेच श्रीमती प्रज्ञा वाघमारे मुख्य प्रकल्प संचालक यांच्या संकल्पनेतून, जिल्हा प्रकल्प अधिकारी विजय बेदरकर यांच्या स्थानिक मार्गदर्शनात समतादूत प्रकल्पाच्या संयोजनात लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



त्यामध्ये अकोला जिल्हा समतादूत टीमच्या मुख्य संयोजनात अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अण्णाभाऊ साठे यांचे जिबनकार्य, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संविधान जागृती, संत महापुरुष यांचे विचार अशा विषयावर आधारित जनजागृतीपर मार्गदर्शक ऑनलाईन प्रबोधन कार्यक्रम, व्याख्याने, चर्चासत्र संपन्न झाली. त्यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत वक्ते, साहित्यिक, नवनियुक्त उच्चपदस्थ अधिकारी, कवी, लेखक, पत्रकार व प्रबोधनकार मंडळी यांनी आपले विचार प्रगट केले. या कार्यक्रमात अकोला जिल्हातील प्रत्येक तालुक्यातील समतादूत यांनी आपल्या तालुका कार्यक्षेत्रातील बिद्यार्थ्यांना लाभार्थ्यांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून या ऑनलाइन उपक्रमाचा प्रचार प्रसार करून आपल्या मुख्य संयोजनात हे कार्यक्रम आयोजित केले होते. या ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रमाचा समारोप दि. ५ ऑगस्टला संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून दैनिक सकाळचे पत्रकार संतोष चक्रनारायन हे लाभले होते तसेच कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून महादर्पणचे रिपोर्टर किरण डोंगरे व समतादूत मनेश चोटमल तसेच प्रज्ञा खंडारे हे लाभले होते. यावेळी लोकगायक सौ.कविता विनोद सिरसाट यांनी आपल्या आवाजातून भीमगीत लोकशाहीर अण्णाभाऊ यांच्या जीवनावर आधारित लोकगीते व भीमगिते यावेळी सादर केली. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक मंडळींनी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी माहिती विषद करून त्यांच्या विचाराची समाजाला खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन केले तसेच बार्टी समतादूत टीम सदस्यांनी यावेळी बार्टीचे विविध उपक्रम, सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती दिली. या ऑनलाइन प्रबोधन कार्यक्रमाला जिल्हातील ग्रामसेवक, सरपंच, विद्यार्थी तसेच इतर लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होत लाभ घेतला.

सप्ताहात एकूण २८ ऑनलाइन कार्यक्रम संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समतादूत रबिना सोनकुसरे, अॅड.वैशाली गवई अकोला, समता तायडे पातूर, शुभांगी लव्हाळे तेल्हारा, स्मिता राऊत बाळापूर, उपेंद्र गावंडे, विनोद सिरसाट बार्शीटाकळी, बालाजी गिरी अकोट यांनी परिश्रम घेतले.

# बार्टीकडून अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्यातर्फे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा शतक जयंती महोत्सव ऑनलाइन साजरा करण्यात आला.

सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने बार्टीच्या समतादूत प्रकल्पांतर्गत राज्यभर तालुकानिहाय अण्णा भाऊ साठे यांची जयंती ऑनलाइन साजरी करण्यात आली. यासाठी समतादूतांनी १ ते ३ ऑगस्ट तीन दिवस प्रबोधनपर कार्यक्रम घेतले. यात नाशिक तालुका समतादूत भीमराव चव्हाण व लता भालेराव यांनी तीन दिवस कार्यक्रम घेतले. पहिल्या दिवशी अंबड, चुंचाळे घरकुल योजना येथे कार्यक्रम झाला. त्यानंतर परिसरातील अमोल कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झूम ॲपद्वारे ऑनलाइन मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी शिक्षक सुभाष पवार यांचे 'अण्णा भाऊ साठे समजून घेताना' या विषयावर ऑनलाइन व्याख्यान झाले. तिसऱ्या दिवशी चंद्रकांत गायकवाड यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या या कार्याची ओळख करून दिली. अध्यक्षस्थानी दीपक थोरात होते. या कार्यक्रमासाठी समतादूत प्रकल्पाच्या जिल्हा प्रकल्पाधिकारी प्रतिज्ञा दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी

# राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती योजनेचा खेळखंडोबा; अनेक विद्यार्थी वंचित !

**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**उस्मानाबाद:** राजर्षी शाहु महाराज शिक्षणशुल्क प्रतिपुर्ती योजनेपासून अनेक विद्यार्थी वंचित राहत आहेत. विद्यार्थ्यांना या योजनेसंदर्भात वेळेत माहिती मिळत नसल्याने अनेकांना शिष्यवृत्तीला मुकावे लागत आहे. त्यामुळे ईमेल, मेसेजद्वारे माहिती देवून शैक्षणिक संस्था व शाळा, महाविद्यालयांना सक्त आदेश देवून या शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी स्टूडंट हेल्पींग हॅन्डच्या वतीने राज्याच्या उच्चतंत्र शिक्षण विभागास निवेदन देण्यात आले आहे.

## योजनेची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

### स्टूडंट हेल्पींग हॅन्ड संघटनेची मागणी

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले की, राजर्षी शाहु महाराज शिक्षणशुल्क प्रतिपुर्ती योजनेतून आर्थिक दूर्बल घटकातील विद्यार्थ्यांचे ५० टक्के शैक्षणीक शुल्क शासनाकडुन भरण्यात येते. या योजनेची माहिती विद्यार्थ्यापर्यंत पोहचत नसल्याने अनेक विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहत आहेत. विद्यापीठ, शैक्षणिक संस्था व कॉलेज परीपत्रक काढून वेबसाईटवर टाकते आणि जबाबदारी झटकते. या योजनेसंदर्भात विद्यार्थ्यांना वेळेत माहिती मिळत नाही. त्यातच ऑनलाईन फी भरणे गरजेचे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा कसा होणार ? हा प्रश्न आहे. शिष्यवृत्तीचा फायदा सुरवातीला दिला तर ते विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त फायद्याचे ठरते. शैक्षणिक संस्था,विद्यापीठ आणि महाविद्यालयाकडून या योजनेच्या अंमबजावणीस दिरंगाई होते. त्यातून हजारो अर्ज प्रलंबित राहतात आणि विद्यार्थ्यांचे नुकसान होते. त्यामुळे शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालयास आदेश देवून या योजनेची प्रभावी अंमलबजावीण करावी, अशी मागणी स्टूडंट हेल्पींग हॅन्डचे अध्यक्ष कुलदीप आंबेकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

लोकमत समाचार

# अन्नाभाउ साठे जयंती निमित्त ऑन लाइन प्रबोधन

अकोला : डॉ. बाबासाहब आंबेडकर अनुसंधान एवं प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे के अंतर्गत समता दूत संस्था की अध्यक्ष प्रज्ञा वाघमारे एवं जिला प्रकल्प अधिकारी विजय बेदरकर के नेतृत्व में अन्नाभाउ साठे जयंती निमित्त ऑन लाइन प्रबोधन किया गया. कार्यक्रम की अध्यक्षता सम्यक संबोधी नवयुवक तरुण मंडल पैसाली के अध्यक्ष विजय जाधव तथा अतिथि के रुप में अन्नाभाउ साठे बहुजन विकास आघाड़ी की वनमाला तायड़े उपस्थित थी. संचालन उपेंद्र गावंडे तथा आभार प्रदर्शन विनोद सिरसाट ने किया. दीपक जाधव, सुनील अंभोरे, विक्की जाधव, दत्ता डोंगरे, अमित पहुरकर, रोशन जाधव आदि ने प्रबोधन का लाभ लिया.

Apna Akola
Page No. 3 Aug 10, 2020
Powered by: erelego.com

# 'गरीब, कष्टकरी साठे यांच्या साहित्याचे नायक'

**सिन्नर |** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील नायक गरीब, वंचित, कष्टकरी होता, असे प्रतिपादन दीपक गायकवाड यांनी केले. पुणे येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्यावतीने आयोजित केलेल्या ऑनलाइन व्याख्यानमालेत ते बोलत होते. तीन दिवस चाललेल्या व्याख्यानमालेत दीपक चांदणे, डॉ. जितेंद्र जगताप आदींत्री व्याख्याने झाली. यावेळी शिवसेनेचे युवा नेते उदय सांगळे, सचिन ढेंगळे, रावसाहेब आढाव, बाळासाहेब आव्हाड, सतीश घोटेकर आदी उपस्थित होते. बार्टीचे महासंचालक कैलास कणसे, प्रकल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे, प्रकल्प अधिकारी प्रतिज्ञा दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले. व्याख्यानमाला यशस्वितेसाठी संदीप घुगे, सविता उबाळे आदींनी प्रयत्न केले.

# बार्टीमार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

दापोली:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी यांच्यावतीने कोरोना प्रादुर्भाव लक्षात घेता ऑनलाईन पध्दतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची शंभरावी जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते युयुत्सू आर्ते यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन व कार्याची माहिती उपस्थितांना दिली. प्रस्तावना व सूत्रसंचालन समतादूत आशिष कांबळे यांनी केले. महेश्वरी विचारे यांनी बार्टीच्या उपक्रमांविषयी माहिती दिली. प्रकल्प अधिकारी सचिन नांदेडकर यांनीही मार्गदर्शन केले.यावेळी देवरुख शासकीय वसतीगृहाचे अधिक्षक फड, हणमंत कांबळे, साठे परिवार, नटके परिवार तसेच विद्यार्थी व समतादूत पूजा वाडेकर, प्राजक्ता मराठे उपस्थित होते. कार्यक्रम सामाजिक न्यायमंत्री ना. धनंजय मुंडे, राज्यमंत्री ना. विश्वजित कदम, प्रधान सचिव पराग जैन-नैनुटीया, बार्टी महासंचालक कैलास कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य पक्रल्प संचालिका प्रज्ञा वाघमारे यांच्या संकल्पनेतून पार पडला.